जिल्हा परिषदेकडे प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेल्या शालेय शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांचे वेतन सेवार्थ प्रणालीमधून अदा करण्याबात .

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन आदेश क्रमांक : पुरमा-२०१९/प्र.क्र.४६/१९/प्रशा-५
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- २ ऑगस्ट, २०१९

<u>वाचा</u>

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , शासन निर्णय शासन निर्णय क्र. संकीर्ण२४१५/प्र.क्र.३२/प्रशा-५, दिनांक १४.११.२०१८
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , शासन निर्णय क्रमांक अनुवि ४९१९/(४२/१८)/अर्थसंकल्प; दि.१४.११.२०१८
३ शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र.अंदाज-१८१/पुमाप्र-२०१९-२०/३१०२, दि.२१.०५.२०१९

<u>प्रस्तावना -</u>

जिल्हा परिषदेतील शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) या कार्यालयातील गट-क व गट-ड या संवर्गातील शासकीय कर्मचाऱ्याचे वेतन व भत्ते हस्तलिखित देयकाव्दारे अदा करण्यात येत होते. संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमधील शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) कार्यालयातील गट-अ व गट-ब मधील अधिकाऱ्यांच्या वेतनाबाबत अनुदान उपलब्ध करुन सेवार्थ मध्ये देयके तयार करून जिल्हा कोषागाराकडून आहरित करण्याची कार्यवाही केली जाते, त्याप्रमाणे जिल्हा परिषदेकडे या विभागातील प्रतिनियुक्तीने कार्यरत असणाऱ्या गट-क व गट-ड संवर्गातील सर्व (पदोन्नतीने/ बदलीने हजर झालेल्या) कर्मचाऱ्याचे वेतन व भत्यांच्या बाबतीत देखील सेवार्थ प्रणालीमधून आहरित करण्याबाबत विधीमंडळाच्या माहे जून,२०१९ च्या अधिवेशनात लाक्षणीक पुरवणी मागणीव्दारे मान्य करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन उक्त कर्मचाऱ्याचे वेतन लेखाशिर्ष २२०२०९८८(३६) सहाय्यक अनुदाने वेतन ऐवजी २२०२०९८८-०१ वेतन या उपलेखाशिर्षातील उपलब्ध निधीतून वितरीत करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

जिल्हा परिषदेकडे प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेल्या शालेय शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) कार्यालयातील गट-क व गट-ड च्या कर्मचाऱ्याचे वेतन सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून मागणी क्र. ई-२,२२०२ सर्वसाधारण शिक्षण ०४ प्रौढ शिक्षण,८०० इतर खर्च ,(००)(०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांच्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजने अनुदाने (इतर प्रौढ शिक्षण कार्यक्रम (२२०२०९८८) ३६ सहायक अनुदाने वेतन या लेखाशिर्षा ऐवजी मागणी क्र.ई-२,२२०२ सर्वसाधारण शिक्षण ०४ प्रौढ शिक्षण,८०० इतर, (००) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांच्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजने अनुदाने (इतर प्रौढ शिक्षण कार्यक्रम (२२०२०९८८)०१ वेतन या लेखाशिर्षातून अदा करण्यास याद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च “मागणी क्र.ई-२,२२०२ सर्वसाधारण शिक्षण ०४ प्रौढ शिक्षण,८०० इतर, (००) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांच्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजने अनुदाने (इतर प्रौढ शिक्षण कार्यक्रम (२२०२०९८८) ०१ वेतन ” या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४६७/१९/व्यय-५, दिनांक २२.०७.२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०२१४४८१२१७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANJAY DATTATRAY MANE

Digitally signed by SANJAY DATTATRAY MANE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=7322cf22539d1c2a9ec41d18debd6a1b1822daa203eedff083386e6f6686c0f5, postalCode=400032, street=MANTRALAYA MUMBAI, serialNumber=cc816238ed3c914e2fa2e99da4bc0ba4e1f6947aa23ad145e3dc6a469041090f, ou=SPORTS EDUCATION AND SPORTS DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SANJAY DATTATRAY MANE
Date: 2019.08.02 14:56:18 +05'30'

(सं.द.माने)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१.मा.राज्यपाल,महाराष्ट्र राज्य.
२.मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३.मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मुंबई.
४. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांचे स्वीय सहायक.
५. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
६.प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
७. आयुक्त,शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे,
८. संचालक, अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१०.महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
११. महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर
१२. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१४. शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण), जिल्हा परिषद सर्व
१५. वित्त विभाग (व्यय-५)/अर्थ-८), मंत्रालय, मुंबई,
१६. कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७. निवड नस्ती (प्रशा-५)